# पाचोरा नगरपरिषद कार्यालय पाचोरा

**स्टेशन रोड, पाचोरा जि. जळगांव**

☎ (०२५९६) २४०१०१, २४०१६६ फॅक्स ८. २४३१५५

Website: www.pachoranp.gov.in, Email: copachora@gmail.com

वाचावे :-

१) ईकडील बांधकाम परवानगी प्रारंभ प्रमाणपत्र जा.क्रं./बांध/२४६६/सन २०१६ दि.०९/१२/२०१६

२) श्री.किशोर पितांबर पाटील व प्रशांत बाळकृष्ण पुजारी रा. पाचोरा यांचा दिनांक ०९/०१/२०१८ रोजीचा विनंती अर्ज व त्यासोबत आर्किटेक्ट श्री.नितीन अ.पारगांवकर, जळगांव यांचे दि.०५ जानेवारी २०१८ रोजीचे कंम्पलीशन सर्टिफिकेट.

३) नगरपरीषद अभियंता यांचा दिनांक १५ /०५/२०१८ रोजीचा प्रत्यक्ष पाहणीनुसार तपासणी अहवाल.

## -: भोगवटा प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की,

श्री.प्रशांत बाळकृष्ण पुजारी रा.पाचोरा यांना पाचोरा नगरपरीषद क्षेत्रातील सर्व्हे नंबर ५८/१ अ पैकी मधील भुखंड क्रं. ०५+०६+११+१२ चे एकुण क्षेत्र १११४.८३ चौ.मी. जागेवर तळ मजल्यावर वाणिज्य प्रयोजनार्थ २४१.४८ चौ.मी. व रहिवास प्रयोजनार्थ ४२.०८ चौ.मी. , रहिवास प्रयोजनार्थ प्रथम + दुस-या मजल्यावर प्रत्येकी ५०७.६८ चौ.मी. असे एकुण १२९८.९२ चौ.मी. बांधकामासाठी उक्त संदर्भीय क्रं.१ अन्वये परवानगी देण्यात आलेली आहे.

नगरपरीषदेने दिलेल्या परवानगी व मंजुर नकाशाप्रमाणे तळ मजल्यावरील वाणिज्य प्रयोजनार्थ २४१.४८ चौ.मी. व रहिवास प्रयोजनार्थ ४२.०८ चौ.मी.असे एकुण २८३.५६ चौ.मी. बांधकाम पुर्ण केलेले असल्याचे उक्त संदर्भीय क्रं.२ च्या अर्जासोबत आर्किटेक्ट श्री.नितीन अ.पारगांवकर, जळगांव यांचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे. त्याअनुषंगाने उक्त नमुद पुर्ण झालेल्या बांधकाम क्षेत्राचे इमारत वापराकरीता भाग:श भोगवटा प्रमाणपत्र खालील अटी व शर्तीस अधिन राहुन देण्यात येत आहे. भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

नगरपरीषदेच्या मंजुर प्लॅन व्यतीरीक्त ईमारतीचे कोणतेही वाढीव बांधकाम वा फेरबदल करु नये. मंजुर बांधकाम नकाशा व्यतीरीक्त बांधकाम आढळल्यास ते मालक / भोगवटादार यांनी स्वत:हुन हटविणे बंधनकारक राहील. आणि सदर अनाधिकृत विनापरवानगी बांधकाम महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम तरतुदीच्या अधिन कारवाईस पात्र राहील.

व्यापारी संकुल + रहिवास ईमारत मालक / भोगवटादार यांनी ईमारत आवारातील रेन वॉटर हार्वेस्टींग, सांडपाणी नियोजन, कचरा संकलन आणि वृक्ष संवर्धन इ.कामे कायमस्वरुपी सुस्थितीत राखणे बंधनकारक आहे.

ईमारती सभोवताल वृक्ष लागवड व ईमारती लगत वाहन पार्किंग मुळे वाहतुक व्हिजीबीलीटी ॲबस्ट्रक्ट होणार नाही. यासाठी दक्षता घेण्यात यावी. पार्किंग नियमांचे पालन करावे. ईमारत आवार व लगतचा परिसर पार्किंग क्षेत्र कायम मोकळे ठेवावे.

प्रत्येक फ्लोअरवर सार्वजनिक जिना, वहिवाट वापर आणि आग प्रतिबंध यंत्रणा कायमस्वरुपी सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी. अग्निसुरक्षा प्राधिकरणाकडून ईमारत वापर प्रमाणीत करुन घ्यावे.

व्यापारी संकुल + रहिवास ईमारतीमधील गाळयांमध्ये करावयाच्या व्यवसायाबाबत आवश्यक त्या विहीत परवानग्या / मंजु-या / ना हरकत प्रमाणपत्र इ.साठी स्वतंत्रपणे सबंधीत कार्यालय / विभाग / खात्यांकडून कार्यवाही करुन प्राप्त करुन घेणे मालक / भोगवटादार यांना बंधनकारक राहील.

व्यापारी संकुल + रहिवास ईमारतीमधील कच-यासाठी पर्यावरण अधिनियम १९८६ आणि घनकचरा व्यवस्थापन नियम १९८८ च्या तरतुदीनुसार आणि नगरपरीषद प्रचलीत उपविधीनुसार स्वतंत्रपणे विल्हेवाट / अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. मुख्यत्वे खाद्य पदार्थ, टाकाऊ कचरा सुरक्षितपणे विल्हेवाट करावी. त्यामुळे लगतच्या वहिवाट धारकांना अडचण ठरणार नाही. याची दक्षता घ्यावी.

व्यापारी संकुल + रहिवास ईमारत परिसर आणि ईमारत विल्हेवाट वापर ईको फ्रेंडली तत्वाच्या अधिन / शासन नियमांच्या अधिन ठेवणे आपणावर बंधनकारक राहील.

जा.क्र./बांध/११८०/१८
दि. ११ ६/१८

मुख्याधिकारी,
पाचोरा नगरपरीषद, पाचोरा.
जि.जळगांव.

प्रत :-

१) कर अधिक्षक, वसुली विभाग, पाचोरा नगरपरीषद यांचेकडेस व्यापारी संकुल ईमारतीची तपासणी करुन सत्वर कर आकारणी लागु करणेसाठी रवाना.

२) आरोग्य निरीक्षक, पाचोरा नगरपरीषद यांचेकडेस व्यापारी संकुल ईमारत वापरासाठी सुरु झाल्याबरोबर कच-याची विल्हेवाट अंमलबजावणी योग्यता तपासण्यात यावी.

# पाचोरा नगरपरिषद कार्यालय पाचोरा

**स्टेशन रोड, पाचोरा जि. जळगांव**

☎ (०२५९६) २४०१०१, २४०१६६ फॅक्स ३. २४३१५५

Website: www.pachoranp.gov.in, Email: copachora@gmail.com


जा.क्रं./बांध/२०५५ /सन २०२० दिनांक :२४/१२/२०२०

## -: भागश: भोगवटा प्रमाणपत्र क्रं. २ :-

प्रति,

सहयोग क्रिएशन्स तर्फे भागीदार
श्री. किशोर पितांबर पाटील,
पाचोरा.

प्पाचोरा नगरपरीषद क्षेत्रातील सर्व्हे नंबर ५८/१अ पैकी मधील भुखंड क्रं. ५+६+११+१२ (एकुण क्षेत्र १११४.८३ चौ.मी ) जागेवर वाणिज्य + रहिवास प्रयोजनार्थ नगरपरीषदेने क्रं. २४६६ दि. ०९/१२/२०१६ अन्वये दिलेल्या बांधकाम परवानगी व मंजुर नकाशाप्रमाणे तळ मजल्याचे (क्षेत्र २८१.४८ चौ.मी.) बांधकाम आर्किटेक्ट श्री. नितीन अ.पारगांवकर, जळगांव यांच्या देखरेखी खाली पूर्ण झाल्याने सदर तळ मजल्याचे बांधकामाकरीता नगरपरीषदेने क्रं.११९० दि.११/०६/२०१८ अन्वये भागश: प्रमाणपत्र क्रं.१ देण्यात आलेले आहे.

आता नगरपरीषदेने दिलेल्या परवानगी व मंजुर नकाशाप्रमाणे प्रथम मजल्याचे (क्षेत्र ५०७.६८ चौ.मी.) आर्किटेक्ट श्री.प्रमोद एस.पाटील, पाचोरा यांच्या देखरेखी खाली पूर्ण करण्यात आलेले असून सदर प्रथम मजल्याचे बांधकामास खालील अटी व शर्तीस अधिन राहुन भागश: भोगवटा प्रमाणपत्र क्रं.२ देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१) नगरपरीषदेच्या मंजुर प्लॅन व्यतीरीक्त ईमारतीचे कोणतेही वाढीव / अतिरीक्त बांधकाम वा फेरबदल करु नये. मंजुर बांधकाम नकाशा व्यतीरीक्त बांधकाम आढळल्यास ते मालक / भोगवटादार यांनी स्वत:हुन हटविणे बंधनकारक राहील. आणि सदर अनाधिकृत विनापरवानगी बांधकाम महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम तरतुदीच्या अधिन कारवाईस पात्र राहील.

२) व्यापारी संकुल ईमारत मालक / भोगवटादार यांनी ईमारत आवारातील रेन वॉटर हार्वेस्टींग, सांडपाणी नियोजन, कचरा संकलन आणि वृक्ष संवर्धन इ.कामे कायमस्वरुपी सुस्थितीत राखणे बंधनकारक आहे.

३) ईमारती सभोवताल वृक्ष लागवड व ईमारती लगत वाहन पार्किंग मुळे वाहतुक व्हिजीबीलीटी ॲबस्ट्रक्ट होणार नाही. यासाठी दक्षता घेण्यात यावी. पार्किंग नियमांचे पालन करावे. ईमारत आवार व लगतचा परिसर पार्किग क्षेत्र कायम मोकळे ठेवावे.

४) प्रत्येक फ्लोअरवर सार्वजनिक जिना, वहिवाट वापर आणि आग प्रतिबंध यंत्रणा कायमस्वरुपी सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी. ईमारत वापर सुरु करण्यापूर्वी अग्निसुरक्षा प्राधिकरणाकडून नाहरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

५) व्यापारी संकुल ईमारतीमधील गाळयांमध्ये करावयाच्या व्यवसायाबाबत आवश्यक त्या विहीत परवानग्या / मंजु-या / ना हरकत प्रमाणपत्र इ.साठी स्वतंत्रपणे सबंधीत कार्यालय / विभाग / खात्यांकडून कार्यवाही करुन प्राप्त करुन घेणे मालक / भोगवटादार यांना बंधनकारक राहील.

६) सामासिक अंतरामध्ये कुठल्याही स्वरुपाचे बांधकाम अनुज्ञेय राहणार नाही. ती कायमस्वरुपी प्रकाश व हवेसाठी खुली ठेवण्यात यावी.

७) सदर ईमारतीच्या स्ट्रक्चरल सबंधीची संपूर्ण जबाबदारी भुखंड मालक तसेच आर्किटेक्ट / अभियंता यांची जबाबदारी राहील.

८) भविष्यात सदर ईमारतीचे बांधकामात कुठलाही बदल करावयाचा असल्यास त्यासाठी पाचोरा नगरपरीषदेची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

९) व्यापारी संकुल ईमारतीमधील कच-यासाठी पर्यावरण अधिनियम १९८६ आणि घनकचरा व्यवस्थापन नियम १९८८ च्या तरतुदीनुसार आणि नगरपरीषद प्रचलीत उपविधीनुसार स्वतंत्रपणे विल्हेवाट / अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. मुख्यत्वे खाद्य पदार्थ, टाकाऊ कचरा सुरक्षितपणे विल्हेवाट करावी. त्यामुळे लगतच्या वहिवाट धारकांना अडचण ठरणार नाही. याची दक्षता घ्यावी.

१०) ईमारत परिसर आणि ईमारत विल्हेवाट वापर ईको फ्रेंडली तत्वाच्या अधिन / शासन नियमांच्या अधिन ठेवणे आपणावर बंधनकारक राहील.

पाचोरा नगर परिषद, पाचोरा
पाचोरा
जि.जळगांव

(प्र) मुख्याधिकारी,
पाचोरा नगरपरिषद,पाचोरा
जि.जळगाव.

प्रत :- कर अधिक्षक, वसुली विभाग, पाचोरा नगरपरीषद यांचेकडेस व्यापारी संकुल ईमारतीची तपासणी करुन सत्वर कर आकारणी लागु करणेसाठी रवाना.